**अत्यंत महत्वाचे**

जा.क्र.मरापप/डीटीएड/प्रशा./११/
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१

दिनांक : ३०/१२/२०११

प्रति,

प्राचार्य,

१) सर्व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,

२) सर्व मान्यता प्राप्त अध्यापक विद्यालये,

शिक्षण निरीक्षक, बृहमुंबई (पश्चिम)

**विषय :** डी.टी.एड्. परीक्षा सप्टेंबर-२०११
द्वितीय वर्ष निकालाबाबत.

सप्टेंबर-२०११ मध्ये झालेल्या डी.टी.एड्. द्वितीय वर्ष परीक्षेचा निकाल परिषदेच्या www.ms-ce.org. या संकेतस्थळावर दि. ०३/०१/२०१२ रोजी **सकाळी ११.०० वा.** पासून पाहता येईल. परंतु सदर परीक्षेची संस्थानिहाय निकालपत्रे, गुणपत्रके दि. १३/०१/२०१२ रोजी संबंधित अध्यापक विद्यालयामधून विद्यार्थ्यांना प्राप्त करुन घेता येतील.

**महत्वाचे : खालील बाबींची पूर्तता होत नसल्यास विद्यार्थ्यांचा निकाल घोषित करु नये.**

१) उपस्थिती **८०% पेक्षा कमी असल्यास** अथवा कमी उपस्थिती सक्षम अधिकारी यांचेकडू क्षमापित केलेली ज़ नसल्यास.

२) **मा. न्यायालयाने** निकाल घोषित करणे संदर्भात **आदेश दिलेले नसल्यास.**

३) सक्षम प्राधिकाऱ्याने परीक्षार्थीचा प्रवेश रद्द केला असल्यास अथवा **व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशास** सक्षम प्राधिकाऱ्याची **मान्यता नसल्यास.**

४) **अन्य कारणामुळे** निकाल राखून ठेवणे आवश्यक असल्यास.

५) अनु.जमातीच्या ज्या विद्यार्थ्यांनी **"जात वैधता प्रमाणपत्र"** सादर केलेले नाही. त्यांच्या गुणपत्रकावर **"जातवैधतेचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नौकरीसाठी ग्राहय धरु नये"** अशी टिप छापण्यात आलेली आहे. ही टीप असल्याची खात्री करुनच गुणपत्रके वितरीत करावीत. वैधता प्रमाणपत्र न दिलेली व टिप नसलेले गुणपत्रक प्राप्त झाल्यास आठ दिवसात ते परीक्षा परिषदेकडे परत करावे.

उपरोक्त अशा प्रकरणी निकाल घोषित केल्यास त्या संबंधीची संपूर्ण जबाबदारी प्राचार्यांची राहील. याची नोंद घ्यावी. सप्टेंबर-२०११ च्या परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना गुणपडताळणी करावयाची आहे, त्यांनी गुणपडताळणीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित प्राचार्यामार्फत **"आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१"** या पत्त्यावर **२४ जाने. २०१२** पर्यंत पोहचतील अशा रितीने पाठवावेत. अर्जासोबत गुणपडताळणी शुल्क प्रत्येक विषयासाठी रु.१००/- प्रमाणे **"महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१"** यांचे नावे विहीत केलेल्या चलनाने भरावे.

२४ जाने. २०१२ नंतर या कार्यालयास प्राप्त होणाऱ्या गुणपडताळणी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधित परीक्षार्थ्यांना स्पष्ट कल्पना देण्यात यावी. गुणपडताळणीचे अर्ज आपल्या शिफारशीसह पाठवावेत. अर्जाचा नमुना अधिसूचनेसोबत जोडला आहे. परीक्षार्थीनी परस्पर गुणपडताळणीचा अर्ज करु नये त्याचा विचार केला जाणार नाही.

**(कृ.मा.प.)**

सप्टेंबर-२०११ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेच्या निकालात कोणत्याही प्रकारची त्रुटी असल्यास (उदा.नावात चुकीची नोंद, विषय बदल चुकीचे गुण, माध्यम बदल, उपस्थित ऐवजी अनुपस्थित) अशा त्रुटीचा तपशील या कार्यालयास आपल्यामार्फत निकाल जाहीर झाल्यापासून **"तात्काळ"** सादर करण्यात यावा. सदरची दुरुस्ती **परीक्षेच्या निकालाच्या दिनांकापासन एक महिन्यापर्यंतच** केली जाईल. त्यानंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

अ) सर्व परिक्षार्थीसाठी आवेदनपत्र संगणक प्रमालीद्वारे (On line) परिषदेच्या संकेतस्थळावर आवश्यक ती माहिती नमुद करून पाठवावी.

ब) ज्या विद्यार्थ्यांचे निकाल राखीव आहेत त्यांचे नांवासमोर संस्थानिहाय निकालात पुढे नमुद केल्याप्रमाणे शेरा असल्याबाबतची बाब संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | "Res. C.T." | - | न्यायालयीन प्रकरणामुळे राखीव |
| २) | "Res. C.P." | - | कॉपी केस |
| ३) | "Res. L." | - | वार्षिक पाठ न झाल्याने राखीव |
| ४) | Reserve P.C | - | प्रात्यक्षिक गुणांमधील तफावतीमुळे राखीव व इतर |
| ५) | "Reserve | - | डी.टी.एड्.५० मधील त्रुटीमुळे राखीव |

ज्या विद्यार्थ्यांच्या नावासमोर **"No Candidate"** नमूद केले आहे. त्यांची संपादणूक रद्द झालेली असून त्यांनी संबंधित वर्षात पुन्हा प्रवेश घेऊन परीक्षा पूर्व अटी (उपस्थिती, अंतर्गत काम) पूर्ण करून पुढील मुख्य परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी पूर्तता करावी.

**(महावीर माने)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-१**

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

१) सर्व प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सर्व

२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना माहितीसाठी

राज्य तार शीघ्र

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक
------------------------- विभाग -------------------------

डी.टी.एड.परीक्षा व्दितीय वर्ष सप्टेंबर-२०११ चा निकाल दि. ०३/०१/२०१२ रोजी परिषदेच्या www.ms-ce.org या संकेतस्थळावर सकाळी ११-०० पाहता येईल. परंतु सदर परीक्षेची संस्थानिहाय निकालपत्रे, गुणपत्रके दि. १३/०१/२०१२ रोजी संबंधित अध्यापक विद्यालयामधून विद्यार्थ्यांना प्राप्त होतील.

एक्झामब्युरो(.)

---

जा.क्र.मरापप/डीटीएड/प्रशा/निकाल/
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग,पुणे-१
दिनांक : ३०/१२/२०११

**स्थळ प्रत मा. आयुक्त यांनी मान्य केली आहे.**

आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१ करिता

विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
आपण आपल्या अधिनस्त सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थ यांना परिषदेकडून प्राप्त होणारी निकालपत्रके व गुणपत्रके आपल्या कार्यालयाकडून तात्काळ देण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळवावे.

आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१ करिता

**<u>तात्काळ</u>**

जा.क्र. मरापप/डीटीएड्/प्रशा/११/
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१

दिनांक:-३०/१२/२०११

**प्रति,**

१. मा. महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक
   पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर
३. मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई-४०० ०३०
४. मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई-४०० ०२०
५. मा. संचालक, आकाशवाणी
   पुणे/नागपूर/औरंगाबाद/जळगाव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६. सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७. वृत्तपत्र संपादक

**विषय:-** <u>डी.टी.एड्. परीक्षा सप्टें.२०११</u>
निकाल प्रसिध्दीपत्रक (द्वितीय वर्ष)

**महोदय,**

सप्टें.२०११ मध्ये घेण्यात आलेल्या डी.टी.एड्. परीक्षेच्या द्वितीय वर्षाचा निकाल **दि.** ०३/०१/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजले नंतर परिषदेच्या **<u>www.ms-ce.org</u>** या संकेतस्थळावर पाहता येईल. प्रसिध्दी करावयाचे निवेदन सोबत जोडण्यात आले आहे.

सदर निवेदन आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रातून, आकशवाणी केंद्र व दूरदर्शन केंद्राकडून विनामूल्य प्रसिध्द करण्याची व्यवस्था करावी. ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-१ करिता**

प्रत-माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे-१
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग
३. शिक्षणाधिकारी, माध्यमिक व प्राथमिक सर्व जिल्हा परिषद
४. शिक्षण निरीक्षक (प.द.उ.)
५. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व

प्रत-माहितीसाठी सविनय सादर

१. मा. खाजगी सचिव, मा.ना.शालेय शिक्षण मंत्री, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. खाजगी सचिव, मा.ना.शालेय शिक्षण राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

# प्रसिध्दीपत्रक

**डी.टी.एड्. परीक्षा द्वितीय वर्ष सप्टें.2011 चा निकाल**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेतर्फे सप्टेंबर-2011 मध्ये घेण्यात आलेल्या डी.टी.एड्.परीक्षा म्हणजेच अध्यापक शिक्षण पदविका द्वितीय वर्ष परीक्षेचा निकाल दि. **03/01/2012** रोजी सकाळी 11.00 वाजता परिषदेच्या **www.ms-ce.org** या संकेतस्थळावर पाहता येईल. सदर परीक्षेची गुणपत्रके दि. 13/01/2012 रोजी संबंधित अध्यापक विद्यालयामधून विद्यार्थ्यांना प्राप्त करुन घेता येतील.

सर्व मान्यता प्राप्त अध्यापक विद्यालयांच्या अधिकृत प्रतिनिधींनी निकाल ताब्यात घेण्यासाठी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांशी/मुंबईतील अध्यापक विद्यालयांनी शिक्षण निरीक्षक दक्षिण यांचेशी संपर्क साधावा.

**सही/-**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-1**

# PRESS NOTE

**Result of D.T.Ed. Second Year Examination September-2011**

The result of the D.T.Ed. Second Year Examination conducted by Maharashtra State Council of Examinations, Pune in September-2011 will be declared on 03/01/2012 at 11.00 a.m. on Parishad's Web Site www.ms-ce.org. The Marksheet & Resultsheet will be distributed to D.T.Ed. Colleges through the concerned Principal, District Institute of Education & Training/Educational Inspector, Mumbai (South). The authorized representative of the concerned district for collection of the result of concern Examination.

**Sd/-**
**Commissioner,**
**Maharashtra State Council**
**Of Examinations,**
**Pune-1**